ARTHA
Poona 4.

Reg. No. B. 3434. Licence No. 53,
Licenced to post without prepayment

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

वर्ष १७ पुणें, बुधवार तारीख १४ मार्च, १९५१ अंक ११

॥ श्री ॥

## दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लिमिटेड, पुणें २.

— नवीन हंगामाची —

वीस लक्ष रुपयांची साखर तयार झाली

आणखी वीस लक्ष रुपयांची साखर तयार होत आहे.

साखर-विक्रीवर सरकारी नियंत्रण असल्यामुळें

३० जून १९५१ पर्यंत

★ एक वर्ष मुदतीच्या ठेवी कंपनी स्वीकारील ★

ऑर्डिनरी शेअरच्या भरलेल्या रकमेवर

★ गेलीं ९ वर्षें कंपनीनें १० टक्के नफा दिला आहे. ★

तेवीस लक्ष रुपयांचे शेअर मंजूर झाले आहेत.

★ शेअर-विक्री सुरू आहे ★

शेअर व ठेवींचे फॉर्म कंपनीच्या पुणें येथील मुख्य कचेरींत मिळतील.

★ ठेवींची मुदत १ वर्ष : व्याज ६ टक्के ★

दि. ५ मार्च १९५१.
कॉमनवेल्थ बिल्डिंग, ९८०
सदाशिव पेठ, लक्ष्मीरोड, पुणें २.

चंद्रशेखर गोविंद आगाशे,
बी. ए., एलएल. बी.,
सी. जी. आगाशे ॲण्ड को.,
मॅनेजिंग एजंट्स्.

दळणाच्या चक्क्या—टूल ग्राइंडर्स
मशीन टूल्स
कडबा कापण्याचीं यंत्रें—करवत मशीन्स.
या मालाबद्दल आमचेकडे चौकशी करण्यास विसरूं नका.
केळकर बंधु, लक्ष्मी रोड, पुणें शहर.

# विविध माहिती

**उत्तर प्रदेशांतील धान्यपुरवठा**—उत्तर प्रदेश राज्याचे मुख्य प्रधान, श्री. गोविंद वल्लभ पंत ह्यांनीं विधिमंडळाच्या बैठकींत असे उद्‌गार काढले कीं, ३१ डिसेंबर १९५१ नंतर राज्याबाहेरून अन्नधान्याचा कणही न आणतां राज्य सरकार जनतेला अन्नधान्याचा पुरवठा करूं शकेल. मात्र, पुरवठ्याबाबतची सर्व जबाबदारी राज्य सरकारकडे सोपविण्यांत आली पाहिजे.

**भारतासाठी ६,००० ट्रॅक्टर्स**—मध्यवर्ती भारतीय सरकार आणि राज्य सरकारें हीं दोघें मिळून चालू सालीं सुमारें ६,००० यंत्रचलित नांगर आयात करतील असा अंदाज करण्यांत आला आहे. ह्या नांगरांचा उपयोग पडिक जमीन लागवडीखालीं आणण्यासाठीं करण्यांत यावयाचा आहे. अधिक धान्य पिकविण्याच्या मोहिमेंत त्यांचा चांगला उपयोग होईल.

**एका वर्षांत पांचवा पीक**—कृत्रिम किरणांचा उपयोग करून एका वर्षांत गव्हाचीं पांच पिकें काढण्यांत रशियन शास्त्रज्ञांना यश आलें आहे, अशी वार्ता प्रसिद्ध झाली आहे. सो. रशिआंतील विस्तीर्ण सामुदायिक शेतीवर कृत्रिम किरणांचा उपयोग कसा करण्यांत आला त्याचा तपशील मात्र अद्याप समजलेला नाहीं.

**नवीन कंपन्यांची नोंदणी**—१९ एप्रिल, १९४८ ते ३१ मार्च, १९५१ ह्या दरम्यान ज्या औद्योगिक कंपन्यांनीं प्रत्यक्ष उत्पादनाला सुरवात केली असेल, त्या कंपन्यांनीं आपलीं नांवें सरकारच्या इन्कम टॅक्स खात्यांत नोंदवून घ्यावींत असा सल्ला त्यांना देण्यांत आला आहे. प्राप्तीवरील करापासून माफी मिळविण्याच्या प्रसंगीं अशा नोंदीचा त्यांनाच उपयोग होईल असाहि इशारा देण्यांत आला आहे. करमाफी मिळण्यास पात्र असलेल्या कंपन्यांनीं प्राप्तीवरील करविषयक तक्ते मात्र नेहमींप्रमाणें पाठवावयाचे आहेत.

**रशिआंतील कायदा व न्याय**—सुप्रसिद्ध 'ब्रिटिश कायदेपंडित मि. प्रिट ह्यांचें 'रशिआंतील कायदा' ह्या विषयावर नुकतेंच एक व्याख्यान झालें. १९३२ नंतर रशिआंत शिक्षा अधिक कडक करण्यांत आल्या असें सांगून मि. प्रिट पुढें म्हणाले कीं, रहाणीचें वाढतें मान आणि रोजगाराची शाश्वति ह्या दोन गोष्टी साध्य झाल्यावर गुन्हेगारांना गुन्हा करण्यास कारण राहिलें नाहीं असें रशियन राज्यकर्त्यांचें मत झालें व म्हणून शिक्षा कडक करण्यांत आल्या. मास्कोमध्यें सुमारें ३,००० वकील असून त्यांपैकीं ४० टक्के स्त्रिया आहेत, अशीही माहिती त्यांनीं सांगितली.

**जननाबद्दलचा चित्रपट व मुलें**—'मनुष्याचें जनन' ह्या नांवाचा एक अमेरिकन शैक्षणिक चित्रपट आहे. लंडनमधले शाळकरी मुलांना हा चित्रपट त्यांच्या आईबापांच्या संमतीनें दाखविला जाणार आहे. जे आईबाप चित्रपट पाहिल्यानंतर तो आक्षेपार्ह आहे असें म्हणतील त्यांच्या मुलांना तो दाखविण्यांत येणार नाहीं. त्याचप्रमाणें शाळकरी मुलांना व मुलींना तो एकत्र दाखविण्यांत येणार नाहीं. ह्या चित्रपटांत सर्व माहिती आकृतींच्या साहाय्यानें देण्यांत आली आहे; छायाचित्रांचा उपयोग करण्यांत आलेला नाहीं.

**जर्मनीसाठी पाकिस्तानचा गहूं**—पाकिस्तान सरकारनें एका प. जर्मन कंपनीला ४०,००० टन गहूं नुकताच विकला. पाकिस्ताननें जर्मनीला 'अ' वर्गाचा २,५०,००० टन गहूं पुरविण्याचें कबूल केलें होतें; परंतु पंजाबांत झालेल्या पुरामुळें वरील प्रतीचा गहूं पुरवितां आला नाहीं. त्याऐवजी 'ब' प्रतीचा गहूं पुरविण्याचें सरकारनें ठरविलें आणि जर्मन कंपनीनेंहि तो घेण्याचें कबूल केलें.

**संयुक्त प्रदेश राज्यांत कोळसा**—विंध्य प्रदेश आणि उत्तर प्रदेश ह्यांच्या सीमारेषेवरील सिंग्रौली भागांत दगडी कोळशाच्या खाणी मोठ्या प्रमाणावर सांपडल्याचें समजतें. भारताच्या भूगर्भ खात्यातर्फे सध्या देशाच्या खनिज संपत्तीचा शोध चालू आहे. शोध चालू असतांना संयुक्त प्रदेश राज्यांतील मिर्झापूर जिल्ह्यांत कोळशाच्या खाणी आढळून आल्या.

**पूर्व पंजाब सरकारला कर्ज**—पूर्व पंजाबची राजधानी चांदीगड येथें नव्यानें वसविण्यांत येणार आहे. ह्या खर्चासाठीं भारतीय सरकारनें चालू सालीं ८० लक्ष रुपये मंजूर केले आहेत. पंजाबांतील निराश्रितांना मदत देण्यासाठीं पंजाब सरकारला तीन फडणिशी वर्षांत मिळून ३ कोटी रुपये कर्ज मिळणार आहे. त्या कर्जापैकींच वरील रक्कम हा एक भाग आहे.

**टोळाच्या अंड्यांचा नाश**—पूर्व पंजाबांतील कित्येक खेड्यांत टोळधाड आली असून टोळांनीं अंडीं घातलीं आहेत. ज्या खेडेगांवांत हीं अंडीं सांपडतील तेथून तीं ४ आणे शेराप्रमाणें विकत घेऊन त्यांचा नाश करण्यांत येत आहे. जमिनींतील अंडीं उकरून वर काढण्यासाठीं ट्रॅक्टर्स व जमीन सपाट करण्याचीं यंत्रें ह्यांचाही उपयोग करण्यांत येत आहे.

**मध्यभारतांत कागदाची गिरणी**—चंबळ नदीवर बांधण्यांत येणाऱ्या धरणाच्या विजेचा उपयोग करून धरणाजवळच कॉस्टिक सोड्याचा एक आणि कागदाचा एक असे कारखाने काढण्याचा विचार चालू आहे. ह्या भागांतील गवताचा उपयोग कारखान्याला कच्चा माल म्हणून होऊं शकेल. ह्या गवताचा उपयोग करून बदामी, तपकिरी आणि धुवट पांढऱ्या रंगाचा कागद तयार करतां येईल, असें समजतें.

**भारतांतील गालिच्यांचा धंदा**—ब्रिटनमधील गालिच्यांचे कारखानदार नुकतेच भारतांत येऊन गेले. भारत सरकारच्या धोरणामुळें भारतीय गालिच्यांचे कारखानदार ब्रिटिश कारखानदारांपेक्षा अधिक सवलती भोगीत आहेत, असे उद्‌गार त्यांनीं काढले. ह्या धंद्यासाठीं भारताकडून येणाऱ्या लोकरीवर व तागावर ब्रिटननें जबर आयात जकात बसविली आहे. भारतीय गालिचे मात्र ब्रिटनला कोणतीहि जकात न देतां निर्यात करतां येतात असें समजतें.

—सर्व प्रांतांतील—
सुती-गरम-रेशमी
—खादीचें माहेरघर—
खादी मन्दिर
२६०, बुधवार पेठ
दमडेरे बोळाजवळ,
पुणें २.

# अर्थ

बुधवार, ता. १४ मार्च, १९५१



संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे


## मध्यम वर्गाचें भवितव्य

गेल्या कांहीं वर्षांत मध्यम वर्गाच्या भवितव्याविषयीं जगांतील सर्व विचारवंत विचार करूं लागले आहेत. ह्या वर्गाच्या परिस्थितीचा आणि भवितव्याचा अभ्यास करण्यासाठी 'इंटर नॅशनल इन्स्टिटयूट ऑफ दि मिडल क्लासेस' ह्या नांवाची एक संस्थाहि नुकतीच स्थापन करण्यांत आलेली आहे. मध्यम वर्गाचें सामाजिक स्थान 'वर्ग' म्हणून फारसें महत्त्वाचें नाहीं असें समजण्यांत येतें. त्या समजुतींत काय ग्राह्यांश असेल तो असो; पण इतकें मात्र खरें कीं सामाजिक व शास्त्रीय विषयांच्या विविध क्षेत्रांत पुढारीपण करणारे बुद्धिवान् पुरुष सामान्यतः ह्याच वर्गांतून पुढें आलेले आहेत. आतां मात्र अशी परिस्थिति उत्पन्न झालेली आहे कीं, आर्थिक पेचाच्या चक्रांत सांपडल्यामुळें असे पुढारी उत्पन्न होत रहाण्याची शक्यता दुरावत चाललेली आहे. ह्या नवीन परिस्थितीचा समाजावर आणि खुद्द मध्यम वर्गावर विपरीत परिणाम होईल असाहि संभव दिसत आहे. धनिक वरिष्ठ आणि गरीब कनिष्ठ ह्यांच्या दरम्यान मध्यम वर्ग भरडला जात आहे.

भारतांतील मध्यम वर्गाविषयीं श्री. गगनविहारी मेहता ह्यांनीं कांहीं दिवसांपूर्वी एक व्याख्यान रेडिओवर दिलें होतें. त्यांच्या व्याख्यानांतील माहिती आर्थिक दृष्ट्या बरीच उद्बोधक आहे. मध्यम वर्ग ही कल्पना सर्वस्वीं आर्थिक स्वरूपाची नसली तरी त्या कल्पनेंत ह्या वर्गाच्या आर्थिक स्थितीला महत्त्वाचें स्थान आहे, हें नाकारून चालणार नाहीं. श्री. मेहता ह्यांनीं मध्यम वर्गासंबंधींचे आपले आकडे प्राप्तीवरील करविषयक आकड्यावरून जमविले आहेत. ते असे:–भारतांत दरमहा ३०० ते २००० रुपये मिळविणाऱ्या लोकांची एकूण संख्या सुमारें ३ लाखच आहे. भारताच्या ३५ कोटी लोकसंख्येपैकीं मध्यम वर्गीयांची एकूण संख्या जास्तींत जास्त २० लाख असावी. श्री. मेहता ह्यांनीं आपल्या माहितींत शेतीच्या व्यवसायांतील मध्यम वर्गीयांचा अंतर्भाव केलेला नाहीं, हें मात्र लक्षांत ठेवलें पाहिजे. गेल्या दहा वर्षांत मध्यम वर्गाची आर्थिक परिस्थिति बरीच खालावलेली दिसून येते. १९३८–३९ मध्यें मासिक २५० ते २००० रुपये मिळविणाऱ्या मध्यम वर्गाच्या वांटणीला राष्ट्रीय उत्पन्नाचा साधारणपणें शेकडा ५ टक्के भाग येत असे. आज ह्याच गटाच्या वांटणीला ३॥ ते ४ टक्के भाग येतो. ह्या गटांतील लोकांच्या संख्येंत वाढ मात्र झालेली आहे. १९३८–३९ सालामध्यें ५०० ते १००० रुपये दरमहा मिळविणाऱ्या मध्यमवर्गीय लोकांचें एकूण उत्पन्न ५० कोटी रुपये होतें. १९४८–४९ मध्यें ह्या गटाचें उत्पन्न ८० कोटी रुपये झालें; म्हणजे एकूण उत्पन्नांत ३० कोटी रुपयांची भर पडली. दरमहा १ हजार ते २ हजार रुपये मिळविणाऱ्या गटाच्या आर्थिक परिस्थितींत मात्र बराच अनुकूल फरक पडलेला दिसून येतो. १९३८–३९ सालामध्यें वरील गटाचें एकूण उत्पन्न २० कोटी रुपये होतें. १९४८–४९ सालामध्यें ह्या गटाचें उत्पन्न १०० कोटी रुपये झालें ह्या आंकड्यांवरून एक गोष्ट स्पष्ट दिसून येते, ती अशी कीं खुद्द मध्यम वर्गांतच आतां दोन पोट वर्ग पडत चालले आहेत यांकीं, पहिल्या गटाच्या एकूण उत्पन्नांत वाढ झालेली असली तरी ती फार तर दीडपट आहे. दुसऱ्या गटाच्या एकूण उत्पन्नांत मात्र तिप्पट वाढ झालेली दिसून येते. एकूण उत्पन्नाच्या वाढीच्या प्रमाणांत दोन गटांत जी तफावत दृष्टीस पडते तशीच तफावत गरीब वर्गाच्या व वरिष्ठ वर्गाच्या एकूण उत्पन्नांत पडत असेल तर त्यांचे परिणाम फार वाईट होतील; आणि चढत्या किंमती, घटता रोजगार व घटतें उत्पन्न ह्यांच्या कात्रींत सांपडलेल्या लोकांची दैना आणखी उडाल्याशिवाय रहाणार नाहीं.

## ऑडिटर्सवरील मोठी जबाबदारी

मद्रास विभागांतील इन्स्टिटयूट ऑफ चार्टर्ड अकौंटंट्स ह्या संस्थेची वार्षिक परिषद् मद्रास येथें भरली होती. परिषदेचे उद्घाटक, न्यायमूर्ति विश्वनाथशास्त्री, ह्यांनीं ऑडिटर्सच्या जबाबदारीबद्दल व कर्तव्याबद्दल पुढील महत्त्वाचे विचार व्यक्त केले.

श्री. विश्वनाथशास्त्री म्हणाले, "व्यापारी कंपनीची तुलना एखाद्या मोटारगाडीशीं केली, तर त्या गाडीला वळविण्याचें चक्र ऑडिटर्सच्या हातीं असतें असें म्हणतां येईल. अत्यंत उच्च प्रतीची सचोटी आणि निःपक्षपातीपणा त्यांनीं आपल्या धंदेवाईक वागणुकींत आणला तरच जनतेचा विश्वास संपादन करतां येईल आणि भांडवलाचा ओघ उत्पादक उद्योगधंद्यांकडे वळूं लागेल. छोटे व्यापारी आणि धंदेवाले ह्यांना अजूनहि आपले हिशेब पद्धतशीर ठेवण्याची संवय लागलेली नाहीं ही दुःखाची गोष्ट आहे. परंतु प्राप्तीवरील कर आणि विक्रीकर ह्यांच्यामुळें त्यांनाही पद्धतशीर हिशेब ठेवण्याचें महत्त्व पटूं लागलें आहे. सार्वजनिक भांडवलाच्या कंपन्या आणि बँका ह्या संस्थांना कायद्याप्रमाणें ऑडिट करून घ्यावेंच लागतें. ज्या ज्या ठिकाणीं अशा ऑडिटची जबाबदारी ऑडिटर्सवर टाकण्यांत आली आहे त्या त्या ठिकाणीं त्यांच्यावर कर्तव्याचें ओझें पडतें असें माझें मत आहे. जनता, भागीदार आणि कंपनीचे सावकार ह्या सर्वांच्या बाबतींत त्यांना कर्तव्यें असतात. एखाद्या धंदेवाईक कंपनीच्या संघटनेंत आणि धंदा करण्याच्या पद्धतींत कच्चे दुवे कोणते आहेत तें सांगण्याचें कामही ऑडिटर्सनीं करावें असें मला वाटतें. कांहीं हुषार व्यक्ती आपल्या कंपनीची मालमत्ता अयोग्य रीतीनें व नानाप्रकारच्या युक्त्यांनीं फुगवून दाखवितात. असा प्रकार होऊं न देण्याची खबरदारी ऑडिटर्सची आहे. भागीदारांच्या हिताचें संरक्षण करणें हें ऑडिटर्सचें प्राथमिक कर्तव्य आहे. कारण, धंद्याची नक्की परिस्थिति काय आहे आणि आपला पैसा कसा वापरला जातो ह्यासंबंधींचें ज्ञान करून घेण्याचा त्यांना हक्कच आहे. पैसे गुंतविणारे लोक, भागीदार आणि कर्जाऊ ह्या सर्वांना कंपनीबद्दल पूर्ण विश्वास वाटला पाहिजे. ऑडिटर्सची सचोटी वादातीत

असेल तरच भांडवल हें सोनें, चांदी, हिरे-माणक, जमिनी आणि घरें ह्यांच्यांत अडकून न पडतां उत्पादक धंद्याकडे येऊं लागेल. बँका आणि इतर कंपन्या ह्यांच्या ऑडिटर्सच्या जागेसाठी ऑडिटर्सना सध्यां डायरेक्टर्सच्या सदिच्छेवर अवलंबून रहावें लागतें. प्रॉक्सीच्या पद्धतीमुळें असें होतें. म्हणून निवडणुकींत 'प्राक्सी' ची पद्धत ठेवूं नये. सध्यांची पद्धत सदोष असल्यानें ती बदलून घेण्याची खटपट सर्व ऑडिटर्स मिळून एकोप्यानें करतील अशी मी आशा करतों."

---

### अमेरिकेचा अध्यक्ष दोनदांच होता येईल

अमेरिकेच्या अध्यक्षपदाची मुदत चार वर्षांची आहे. कोणालाहि दोन मुदतीपेक्षां अधिक काळ अध्यक्ष होता येणार नाहीं, अशी अमेरिकेच्या राज्यघटनेंत नुकतीच दुरुस्ती करण्यांत आली आहे. अमेरिकेच्या राज्यघटनेनुसार, अध्यक्ष अध्यक्षपदीं असतांनाच मृत्यु पावला तर उपाध्यक्ष आपोआपच त्याची जागा घेऊन अध्यक्ष होतो. अशा तऱ्हेनें एकाद्या मूळ उपाध्यक्षास दुसऱ्या अध्यक्षाच्या मुदतींपैकीं दोन वर्षांपेक्षां अधिक काळ अध्यक्षपदाचा लाभ झाला तर त्याला आणखी एकदाच अध्यक्ष होता येईल अशीहि व्यवस्था नव्या दुरुस्तीनें केली आहे. म्हणजे, उपाध्यक्षाचा नशिबानें झालेला अध्यक्ष फारतर सहा वर्षे अध्यक्ष राहूं शकेल. सध्याचे अध्यक्ष, मि. ट्रुमन ह्यांना प्रस्तुत दुरुस्ती लागू करण्यांत आलेली नसल्यामुळें ते मात्र पुनः अध्यक्ष होऊं शकतील. मि. फ्रँकलिन डेलॅनो रूझवेल्ट ह्यांची चार वेळा अध्यक्ष म्हणून निवडणूक झाली होती; त्याची पुनरावृत्ति आतां कधींच होऊं शकणार नाहीं. मि. ट्रुमन ह्यांची १९५२ सालीं पुनः निवडणूक झाली तर त्यांना अध्यक्षपदाचा जवळजवळ १२ वर्षांवर काळ लाभेल. त्यांना मे, १९५१ मध्यें ६७ वें वर्ष लागेल आणि ते १९५२ मधील निवडणुकींत भाग घेतील किंवा नाहीं हें मात्र आजच सांगता येणें कठीण आहे.

---

### श्री. केंभावी ह्यांचा आगामी ग्रंथ

#### बँकिंग हँडबुक

श्री. विंदू राघवेंद्रराव केंभावी बी. ए. (ऑनर्स) ह्यांनीं वरील पुस्तक लिहिलें असून तें लवकरच प्रसिद्ध होईल असें समजतें. देशाचे उद्योगधंद्यांच्या क्षेत्रांत बँकांना महत्त्वाचें स्थान मिळालेलें आहे. बँकेचे व्यवहार व आपले व्यवहार सुव्यवस्थित करून घेतां यावे आणि बँकांतून चालणारे रोजचे व्यवहार वाचकांना सुलभ व सहज रीतीनें समजावे ह्याच मुख्य उद्देशानें हें पुस्तक लिहिण्यांत आलें आहे. पाश्चात्य देशांत दररोज बँकांच्या कचेऱ्यांतून निरनिराळ्या विषयांसंबंधीं सोपीं पुस्तकें मेजावर मांडून ठेवतात. तीं घरीं नेण्यास सुद्धा परवानगी मिळते. ह्याच छोट्या पुस्तकांच्या धर्तीवर हें पुस्तक सोप्या भाषेंत सर्वांना कळेल असें लिहिलें असून बँकांत काम करणाऱ्यांना व बँकांशीं व्यवहार करणाऱ्यांना हें उपयुक्त होईल अशी अपेक्षा आहे. जाणत्या गिऱ्हाइकांशीं व्यवहार करणें बँकेच्या अधिकाऱ्यांना अधिक सोपें जाऊन त्यामुळें सर्वांचाच फायदा होईल. बँकिंगसंबंधीं आवश्यक ती माहिती पुस्तकांत सुबोध रीतीनें दिलेली आहे. श्री. केंभावी ह्यांचा बँकिंगचा अभ्यास, त्यांचा भारतांतील व परदेशांतील बँकिंगचा अनुभव आणि त्यांची बँकिंगसाठी सेवा करण्याची कळकळ, ह्या सर्वांचीच प्रचीति प्रस्तुत पुस्तकांत येईल.

---


सर्व प्रकारचें बँकिंगचें काम केलें जातें

धी युनायटेड कमर्शिअल बँक लि.

विक्री झालेले भांडवल
रु. ४ कोटी
भरणाई झालेले भांडवल
रु. २ कोटी
राखीव निधी
रु. ६० लक्ष

मुख्य कचेरी
कलकत्ता

जी. डी. बिर्ला, चेअरमन
बी. टी. ठाकूर, जनरल मॅनेजर

स्थापना १९३६

युनायटेड वेस्टर्न बँक, लिमिटेड, सातारा

पॅलेस स्ट्रीट, सातारा.

शाखा—मुंबई फोर्ट, मुंबई गिरगांव, पुणें, नाशिक व वाशीं.

ता. ३१-१२-४९ अखेर

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | १०,००,०००, |
| वसूल भांडवल | रु. | ५,००,००० |
| रिझर्व व इतर फंड्स | रु. | १,५१,००० |
| ठेवी | रु. | ६७,००,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | ७५,००,००० |

मुदत ठेवीवरील व्याजाचे दर :

| १ वर्ष | दोन वर्षे | तीन अगर अधिक वर्षे |
|---|---|---|
| रु. २-८-० | रु. २-११-० | ३ रुपये |

| | | |
|---|---|---|
| सेव्हिंग्ज बँक | दरसाल दर शेंकडा | १-८-० |
| सेव्हिंग्ज डिपॉझिट | " | २-०-० |
| चालू डिपॉझिट | " | ०-८-० |

सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

सी. ह. जोशी, बी. ए., बी. कॉम्., मॅनेजर.
वा. ग. चिरमुले, बी. ए., एलएल. बी., चेअरमन

'अर्थ' ग्रन्थमाला.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

संसदेंत—

## रेल्वे आणि लोकजीवन

स्वतंत्र भारताच्या अर्थकारणांत, लोकजीवन सुसह्य आणि जगत करण्यांत, तसेंच देशाच्या संरक्षण कार्यक्रमांत रेल्वेचें स्थान अनन्यसाधारण आहे. रेल्वेचीं इंजिनें, डबे इत्यादि साधनें नवीन आणि सुस्थितींत असलीं तर कमी खर्चांत प्रचंड प्रमाणांत वहातुक करणें शक्य होतें.

१९२९–३० ची आर्थिक मंदी रेल्वेलाही भोवली. भांडवलावरील व्याज देण्यासाठीं प्रथम रिझर्व्ह फंड आणि नंतर घसारा फंड यांतुन रकमा काढाव्या लागल्या आणि अखेर १९३५–३६ मध्यें व्याज–देण्याची सूट मागावी लागली! मग महायुद्ध आलें. युद्धकार्यासाठीं कित्येक लहान इंजिनें, डबे, रूळ इत्यादि सामान परदेशीं पाठवावें लागलें.

देशांतील युद्धकालीन अपरंपार वाढलेली वाहतूक हातीं असलेल्या जुन्या आणि अपुऱ्या साधनसामग्रीच्या सहाय्यानें करावी लागली. नंतर फाळणी, स्वातंत्र्य आणि भांडारअवा टंचाई आणि आतां तिसऱ्या महायुद्धाचें वातावरण.

थांबावयाला सवड नाहीं. तीस तीस वर्षांचीं जुनीं, भरमसाट कोळसा खाणारीं आणि प्रत्यहीं दुरुस्त करावीं लागणारीं इंजिनें आणि डबे बाद करून नवीन साधनसामग्री जमविलीच पाहिजे. वाढलेल्या किंमतीमुळें जास्त खर्च येत असला तरी तो करावयाला हवा. उद्याचे वाहतुकीचे मार्ग कार्यक्षम राखले पाहिजेत.

आज रेल्वेजवळ ८,३३७ इंजिनें, २,२५,००० माल डबे आणि २१,६५० उतारू डबे आहेत. १९५०–५१ नंतरच्या पांच वर्षांत नवीन १,२६० इंजिनें, १२,००० तें १३,००० माल डबे आणि १,५०० उतारू डबे दर वर्षी मिळावयाला हवेत.

१९५०–५१ मध्यें नवीन ११३ मोठीं आणि ८१ लहान इंजिनें, ३,००० मालडबे आणि ७१५ उतारूडबे खरेदी करण्यांत आले. जून १९५२ पर्यंत १५० इंजिनें येतील. तसेंच एप्रिल १९५१ ते मार्च १९५२ मधील काळांत परदेशी ८,००० लहान मालडबे येतील. त्याशिवाय देशांत तयार झालेले ७,००० लहान मालडबे मिळतील. परदेशी २५० लहान उतारू डबेही येणार आहेत. रु. ३१४ लक्ष किंमतीचीं ११० लहान इंजिनें नोव्हेंबर १९५१ ते सप्टेंबर १९५२ पर्यंतच्या दरम्यान इंग्लंडहून येणार आहेत. चित्तरंजन येथील सरकारी इंजिन कारखान्यांतून मार्च १९५२ पर्यंत ३६ मोठीं इंजिनें मिळतील. टाटा इंजिन कारखान्यांतून लहान इंजिनें मिळूं लागतील. उतारू डबे बंगलोरच्या विमान कारखान्यांत बनविण्यांत येत आहेत.

वाढत्या महागाईंत रेल्वेचा पगार आणि जळण खर्च ४०० टक्क्यांनीं वाढला, तरी उत्पन्नांत वाढ अल्प आहे. माल वाहतुकीच्या दरांत ७३ टक्के आणि उतारू वहातुकीच्या दरांत ४६ टक्के वाढ झाली आहे. वाढता खर्च आणि नवीन साधनसामग्री खरेदी याकरितां लागणारा पैसा उतारू–वहातुकीच्या दरांत १२ ते २५ टक्के वाढ करून उभारावयाची योजना आहे.

१९५१–५२ मध्यें गुड्स आणि पार्सल वहातुकींत वाढ होईल; तसेंच हल्लींच्या दरानें उतारू वहातुकीपासूनचें उत्पन्न रु. ३ कोटींनीं कमी होईल असा अंदाज आहे. मोठ्या प्रमाणांत परदेशी प्रवासी आले तरच वरच्या वर्गाकडून मिळावयाच्या उत्पन्नाची सध्याची घसरगुंडी थांबेल असेंहि रेल्वे मंत्र्यांनीं सांगितलें. अपेक्षित उत्पन्नाचा अंदाज कमी आणि खर्चाचा अंदाज सढळ हातानें करण्याची व्यावहारिक पद्धत असली तरी, रेल्वेमंत्र्यांच्या अंदाजी आंकड्यांवरून पुढील वर्षांतील आर्थिक परिस्थितीची कल्पना येण्यास मदत होते.

रेल्वे हा राष्ट्रीयीकरणांतील ज्येष्ठ आणि श्रेष्ठ धंदा आहे. सरकारच्या हल्लींच्या आर्थिक अडचणींत रेल्वेच्या शिल्लक असलेल्या निरनिराळ्या फंडांतील रकमा सरकारला फार उपयोगी पडत आहेत. १९४८–४९ अखेर सरकारच्या "जनरल फंडांत" रोख शिल्लक रु. १६५ कोटी होती; पैकी रेल्वे फंडाची रक्कम रु. १२१·७१ कोटी होती. तसेंच, १९४९–५० अखेर रु. १४९ कोटींपैकीं रेल्वे फंडाची रकम रु. १२९·६३ कोटी होती. १९५०–५१ अखेर रेल्वे फंडाची रक्कम रु. १५०·९५ कोटींची असेल! जनरल फंडाची उतरण आणि रेल्वे फंडाची वाढती रक्कम लक्षांत घेतां रेल्वेच्या पैशांची सरकारला होणाऱ्या मदतीची कल्पना येते. गेल्या २५–३० वर्षांतील दिवाळखोरीपासूनचा दिवाळीपर्यंतचा इतिहास काळाचें माहात्म्य दाखविणारा नाहीं का?

---

### जानेवारी, १९५० मधील मालाच्या घाऊक किंमतींतील वाढ

अधिकृत निर्देशांकाच्या परिमाणानुसार जानेवारी, १९५१ मध्यें निरनिराळ्या मालाच्या घाऊक किंमतीच्या निर्देशांकांत (ऑगष्ट १९३९ मधील निर्देशांक १०० हें प्रमाण धरून) ०·४ टक्क्यांची वाढ होऊन तो ४१४·३ वर गेला. जानेवारी १९५१ मधील निर्देशांक जानेवारी, १९५० मधील निर्देशांकाहून ७·७ टक्क्यांनीं अधिक आहे.

---

### टिटाघरच्या नफ्यांत वाढ

टिटाघर पेपर मिल्स कं. लि.ला ३० सप्टेंबर, १९५० अखेर संपलेल्या वर्षी १०,२३,३३८ रु. नफा झाला. १९४९ मधील तत्सम सहामाहींतील नफा ८,६८,५७२ रु. होता. कंपनीनें ह्या सहामाहींत जेवढी कागदविक्री केली, तेवढी तिच्या इतिहासांत तत्सम मुदतींत आजवर कधींहि झाली नव्हती.

---

### रेल्वेच्या दरांत सुचविलेली वाढ

| मुंबई ते पुणें | जुना दर | नवा दर |
|---|---|---|
| तिसरा वर्ग | ३–२–० | ३–१२–० |
| दुसरा वर्ग | ८–१२–० | १०–०–० |
| पहिला वर्ग | १५–०–० | १७–०–० |

१ एप्रिलपासून हे दर अंमलांत येणार आहेत.

---

### सहकारी विषयावर व्याख्यानमाला

सहकारी तत्त्वें व त्यांचा व्यवहारांत उपयोग ह्या विषयावर ग्रेटर बाँब को-बोर्डानें एक व्याख्यानमाला गुंफण्याचें ठरविलें आहे. त्यांत अर्थशास्त्रज्ञ व सहकारतज्ज्ञ व्याख्यानें देतील. अधिक माहिती ऑनररी सेक्रेटरी श्री. ए. एच. कुळकर्णी, ९ बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई, ह्यांजकडून मिळेल.

---

भारतांतील रेडिओंची संख्या– ता. ३१–१२–१९५० अखेर भारतांतील रेडिओंची संख्या ५,४४,३५० होती, अशी माहिती दळणवळण मंत्री श्री. रफी अहमद किडवाई ह्यांनीं भारतीय विधिमंडळांत सांगितली.


## अंदाजपत्रकावरून सुचणारे विचार

( मा. म. काळे )

(१) वाढत जाणाऱ्या खर्चामध्यें काटकसर साधणें हें अर्थमंत्र्यांचें एक ध्येय आहे. यामुळें १९५१–५२ मध्यें रु. ४ कोटी ४० लक्ष इतकी बचत होईल, परंतु एकंदर मुलकी खर्च रु. २०० कोटी ४१ लक्ष असून त्यापैकीं रु. १०८ कोटी हा व्याज, पेन्शनें, इ० स्वरूपाचा करावाच लागणारा खर्च असल्यामुळें त्याला कात्री लावितां येण्यासारखी नसल्यामुळें, बाकीच्या रु. ९२ कोटी खर्चांत किती कपात करतां येईल याला मर्यादा आहे. (२) पुढील वर्षी अन्नधान्याच्या आयातीवर जास्तच खर्च, म्हणजे निदान ४० लक्ष टन धान्याच्या आयातीसाठीं खर्च करावा लागणार असल्यामुळें, व त्यानंतरच्या धान्याच्या आयातीच्या परिस्थितीबद्दल निश्चित कांहीं सांगतां येण्यासारखें नसल्यामुळें वातावरण जरासें काळजी निर्माण करणारें आहे. (३) गेल्या कांहीं महिन्यांत स्टर्लिंग शिल्लक थोडीशी वाढली असली, व गेलें १॥ वर्ष व्यापार अनुकूल तफावत दाखविणारा होत असला तरी या दृश्य भरभराटीच्या मागें उत्पादनाची विशेष वाढ नाहीं ही गोष्ट मुख्य आहे, व कापड, साखर ह्यांचें उत्पादन अंतर्गत गरजाहि भागवूं शकत नाहीं हें विचारांत घेतलें पाहिजे. नवीन अंदाजपत्रकामुळें उत्पादन–वाढीला पर्यायानें चालना मिळेल असें कांहीं वाटत नाहीं. (४) करवाढ करून शिल्लक दाखविणारें अंदाजपत्रक दिसत असलें तरी भांडवली खर्चाचें पत्रक विचारांत घेतां अंदाजपत्रक तुटीचेंच म्हणावें लागतें; कारण शिल्लकींतून कांहीं रक्कम खर्चिली जाईल. (५) सरकारच्या अपेक्षेच्या मानानें गेल्या वर्षांत रु. २९ कोटी कमी कर्ज उभारणी होऊं शकली. या गोष्टीवरून सामान्य जनतेची ताकद व भांडवल उभारण्याला लागणारी परिस्थिति यावर प्रकाश पडतो. (६) हिंद व पाक यांचा व्यापारी करार नुकताच झाला असून त्या करारामुळें निर्माण होऊं शकणारे परिणाम विचारांत घेतलेले दिसत नाहीत. (७) भांडवली खर्चांत योग्य प्रकारची काटकसर साधली जात आहे कीं नाहीं याबद्दल मतभेद होणें शक्य आहे. जास्त खुलाशाची अपेक्षा होती. (८) काटकसर व सामान्य जनतेकडून बचत यांवर भर दिला तो योग्य आहे. परंतु एकीकडे करवाढ व दुसरीकडे वाढत जाणारे वस्तूंचे बाजारभाव यांच्यामध्यें सामान्य जनता भरडली जात असतांना या गोष्टी कितपत साध्य होऊं शकतील याबद्दल मात्र शंका वाटते. (९) अर्थमंत्र्यांचें भाषण काळजीपूर्वक वाचलें असतां अनेक सूचक गोष्टी त्यांत दिसतात. त्या म्हणजे अन्नधान्याच्या प्रश्नाबद्दल चिंतनीय परिस्थिति, परराष्ट्रीय व्यापाराचें आजचें भरभराटीचें स्वरूप किती प्रमाणांत किती काळ चालूं शकेल याबद्दल शंका, भांडवल उद्योगधंद्यांत गुंतविलें जाईल किंवा सरकारच्या मागणीप्रमाणें खुल्या बाजारांत उभारलें जाऊं शकेल याबद्दलची संशय निर्माण करणारी परिस्थिति, (१०) करवाढ समर्थनीय नसली तरी अपरिहार्य होती. आजच्या स्वरूपाच्या अर्थव्यवस्थेमध्यें श्रीमंतांवील कर फार तर आणखी वाढविता आले असते, परंतु तसें आज करवणार नाहीं. कदाचित् मृत्युसमयींचा कर ही एक नवीन बाब सुचणारी आहे. (११) कर योजनेचा कांहीं अल्प भाग महागाईला मदत करणारा ठरेल. ...

---


# रोखीनें व हप्त्यानें विकत मिळतात.



जुनी मशीन देऊन नवी
घ्यावयाची असल्यास आम्ही
बदली करून देतों.

## पेडणेकर आणि कं. लिमिटेड

शिवण्याच्या यंत्रांचे व्यापारी, १७२ गिरगांव रोड, मुंबई ४.

तारेचा पत्ता:—PEDNECO, Bombay. फोन नं. २२७३८



# दी भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड

हेड ऑफिस : पुणें शहर

शाखा:—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, श्रीरामपूर ( बेलापूर रोड ), ओझर ( जि. नाशिक )

पे-ऑफिस:—खोपोली ( जि. कुलाबा )

श्री. बी. वी. वाळवेकर ( अध्यक्ष ) | श्री. के. पी. जोशी ( उपाध्यक्ष )

अधिकृत भांडवल रु. १५,४३,८१०
विक्री झालेलें भांडवल रु. ७,९३,८१०
वसूल भांडवल रु. ३,९८,२८५

एकूण खेळतें भांडवल ५३ लाखांचे वर

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

श्री. रा. बा. साळवेकर B. A., LL. B.
श्री. नी. ना. क्षीरसागर
मॅनेजिंग डायरेक्टर.






किर्लोस्कर ब्रदर्स लिमिटेड, किर्लोस्करवाडी

# सहकाराची खरी ओळख

## ( उत्तरार्ध )

लेखकः—श्री. मुकुंद पु. दाणी, बी. कॉम्., जळगांव.

भांडवलदारांच्या स्वार्थी निरासदारीनें औद्योगिक क्षेत्रांत राष्ट्राची प्रगति मंदावूं लागतांच विचारवंतांनीं धंद्याच्या राष्ट्रीयीकरणाचा बाजवी सल्ला दिला. अनेक राष्ट्रांनीं प्रयोगांतीं तो यशस्वीहि करून दाखविला, आणि याच हेतूनें सहकारी संस्थांचे कार्यपद्धतींत, राष्ट्रीयीकरणाचा जरी नाहीं, तरी अन्य एखादा उपाय, चळवळीच्या प्रगतीच्या दृष्टीनें, सत्वर अंगिकारणें जरूरीचें झालें आहे. संस्थेला भांडवलाचा पुरवठा करणाऱ्या भागीदारांतर्फे एक, संस्थेंतील नोकरवर्गातर्फे एक आणि संस्थेच्या कार्यांतील तज्ञ असा एक सरकारी अधिकारी, अशाप्रकारें भांडवलदार, मजूर व जनता अशा सर्व संबंधित घटकांच्या प्रतिनिधींची सांगड घालून केलेलें कार्यकारी मंडळ प्रत्येक संस्थेंत असावें. म्हणजे सध्यां जवळ जवळ सर्वच सार्वजनिक लोकशाही संस्थांतून प्रामुख्यानें आढळून येणारें वैयक्तिक लाग्याबांध्याचें प्रमाण बऱ्याच अंशीं कमी होऊन कोणाच्याही न्याय्य हितसंबंधास काडीमात्र उपसर्ग न पोहोंचतां, थोड्या खर्चात व अल्पावधींत संस्थेच्या कार्यास योग्य मार्गदर्शन होईल. सहकारी संस्थांच्याच काय, परंतु मोठमोठ्या औद्योगिक संस्थांतूनही संपूर्ण राष्ट्रीयीकरणापूर्वीचा एक यशस्वी टप्पा म्हणून याचा सहज स्वीकार करतां येईल असा विश्वास वाटतो.

सहकारी चळवळीची खरीखुरी वाढ होण्यास दुसरी महत्त्वाची अडचण म्हणजे अशा संस्थांचीं अप्रामाणिक कुळें ही होय. सहकारी चळवळीची ही इमारत केवळ प्रामाणिकपणाच्याच पायावर उभी करूं असा चळवळीच्या प्रणेत्यांचा मानस होता, परंतु पूर्व नियोजित इच्छित नकाशाप्रमाणें इमारत न बांधतां आल्यामुळें इमारत बांधून झाल्यावर नकाशांतच दुरुस्ती करण्यासारखें झालें आहे. अगदी यापेक्षांहि स्पष्ट व सोपें कथन करावयाचें झाल्यास, करावयाचा होता गणपति पण झालें मात्र माकड, अशी काहींशी याबाबतींत अवस्था झाली आहे, असें थोडक्यांत म्हणतां येईल. ज्या कारणासाठी संस्थेंतून कर्ज घेतलें त्या व्यतिरिक्त अन्य कारणासाठीच तें खर्च करावयाचें, उत्पन्नांतून आधीं त्यापोटीं असलेलें कर्ज फेडण्या ऐवजीं नवीन नवीन कर्ज मात्र घेत रहायचें, कर्जाची आवश्यकता भासली म्हणजेच संस्थेचे सभासद व्हावयाचें, गरज किंवा जरूरी संपतांच संस्थेच्या सभासदत्वांतून कमी होऊन शिल्लक वर्गणीही खर्च करून बसावयाचें, आपल्याच संस्थेंतून आपल्या मालाची खरेदीविक्री न करतां किरकोळ वैयक्तिक फायद्यासाठी ती इतर अन्य ठिकाणांहून करावयाची, हे नि असे कैक अप्रामाणिकपणाचे छुपे सुरुंग या इमारतीला कसे लागले आहेत अन् त्यामुळें सकृतदर्शनीं भव्य आणि रमणीय दिसणारी ही इमारत हां हां म्हणतां केव्हां ढासळून पडेल याची नीटशी कल्पना केवळ खात्याकडून प्रसिद्ध होणाऱ्या आकडेवारीवरून निष्कर्ष काढणाऱ्या नेत्यांना आणि या आकडेवारीचा मुळींच बोध न होणाऱ्या सामान्य जनतेला होणें जरा कठीणच आहे. या चळवळीशीं सतत आणि निकटचा संबंध असणाऱ्या व चौकस अशा कार्यकर्त्यालाच त्याविषयीं अचूक अंदाज घेणें शक्य होईल.

मनांत आणलें तर चालकासंबंधीची अडचण तात्काळ दूर करणें जसें शक्य होऊं शकेल तसें तें कुळांसंबंधीची अडचण दूर करण्याबाबत मात्र तितकेंसें शक्य नाहीं; त्यास बराच अवसर व दीर्घ तपश्चर्याच लागेल. कारण, सहकारी तत्त्वांचा शिक्षणद्वारा सर्वत्र प्रचार व प्रसार करून चळवळींतील कार्यकर्त्यांची व कुळांची नीतिमत्ता हल्लीं आहे त्यापेक्षां अधिक उच्च पातळीवर आणून ठेवणें, हाच एक खडतर मार्ग—उपाय त्यासाठी आम्हास अवलंबावा लागेल. भारतीय जनतेची नैतिक पातळी याच काय, परंतु इतर अनेक बाबतींत सुद्धां इतर पुढारलेल्या राष्ट्रांपेक्षां बरीच हिणकस आहे. म्हणूनच, कोणतीहि सामाजिक वा आर्थिक सुधारणा आम्हांस जनतेच्या पुरेशा पाठिंब्याविना मधूनच सोडून द्याव्या लागतात. सहकाराची स्थितिहि यापेक्षां कांहीं वेगळी नाहीं. तेव्हां, कार्यकर्त्यांच्या व कुळांच्या नैतिक सुधारणेभावीं या चळवळीचें यश मर्यादितच रहाणार आहे हें विसरून, त्यासाठी कांहीं एक प्रयत्न न करितां केवळ संख्येच्या वाढीवरच चळवळीचें बलाबल अजमावून तिच्या यशाचें सुखदायक स्वप्नच रंगवीत बसविणें कितपत योग्य होईल, हें आम्हींच ठरवावयाचें आहे.

संकुचित नि मर्यादित कार्यक्षेत्र ही या चळवळीच्या प्रगतींतील तिसरी घोंड आहे. सहकारी संस्थांना वाटेल तो व्यवसाय करूं दिला जात नाहीं. त्याचप्रमाणें लहान संस्थांना त्यांच्या बाल्यावस्थेंतच मारक ठरणारी धंद्यांतील चुरस टाळण्यासाठीं प्रत्येक संस्थेला विशिष्ट कार्यक्षेत्र व कालमर्यादा खात्याकडून ठरवून दिल्या जातात, यामुळें या कार्यक्षेत्रापलीकडे आणि कालमर्यादेपलीकडे किफायतशीर धंदा करणें पुष्कळशा संस्थांना सहज शक्य असूनही तसें करूं दिलें जात नाहीं. परंतु जोंपर्यंत अशा संस्थांचा चालकवर्ग निःस्वार्थी नाहीं, त्यांना त्यांच्या संस्थेच्या कार्याचें सखोल ज्ञान नाहीं, आणि जोंपर्यंत ते त्यांची जबाबदारी नीट ओळखीत नाहींत, तोंपर्यंत तरी हीं खात्याचीं बंधनें सर्वथैव अन्यायकारक व अनाठायीं आहेत असा नुसता ओरडा करण्यांत मुळींच अर्थ नाहीं. सहकारी संस्थांनीं आपली जबाबदारी यशस्वी रीत्या पार पाडली व त्याबद्दल टीकेस यत्किंचितहि वाव दिला नाहीं, तरच आमच्या प्रगतींतील ही कृत्रिम अडचण तात्काळ दूर करण्याविषयीं आम्हांस सहकारी खात्याकडे हक्कानें मागणी करतां येईल.

अपवादात्मक कांहीं आदर्श संस्था आणि आदर्श कार्यकर्ते आढळतीलहि. परंतु, सर्वसाधारण सहकारी चळवळीचा—संस्थांचा एकत्रित विचार केल्यास तिचें खरें स्वरूप मात्र हें असें आहे.

( समाप्त )

---

**झारच्या कांच सामानाचा उपयोग**—१९१७ सालीं रशियांत क्रांति झाली त्यावेळीं त्यावेळच्या झारचें कांहीं मूल्यवान कांचसामान युगोस्लाव्हियांत पळवून आणलें होतें. दुसऱ्या युद्धांत जर्मनीनें तें जप्त केलें होतें. जर्मनींतील कम्युनिस्ट—विरोधी रशियन लोकांच्या तें ताब्यांत होतें. त्यांनीं कम्युनिझमविरुद्ध लढण्यासाठी पैसा पाहिजे म्हणून तें सामान ३,२५० पौंडांना विकून टाकलें.

**किंमतीवरील नियंत्रणें रद्द**—अमेरिकन सरकारनें गेल्या महिन्यांत किरकोळीचें कापड, लांकडी सामान, गालिचे, दिवे, इत्यादि वस्तूंच्या किंमतीवर नियंत्रण घातलें होतें. हीं नियंत्रणें रद्द करून त्याऐवजीं किरकोळ विक्रेत्यांच्या नफ्यावर नियंत्रणें बसविण्यांत आलीं आहेत. घाऊक विक्रेत्यांना ज्या किंमती याव्या लागतात त्यांचा बोजा ते किरकोळ विक्रेते ग्राहकांवर टाकतात म्हणून ही नवीन व्यवस्था करण्यांत आली आहे.

### भारत बँकेच्या वाटाघाटी

पंजाब नॅशनल बँकेनें भारत बँकेचे १० कोटी रु. चें देणें पत्करावें; त्यासाठी भारत बँकेनें पंजाब नॅशनल बँकेकडे तेवढ्या किंमतीचे रोखे व इतर जिंदगी द्यावी, अशा प्रकारच्या वाटाघाटी भारत बँकेच्या डायरेक्टरांनीं पंजाब नॅशनल बँकेशीं चालविल्या होत्या. रिझर्व्ह बँकेनें भारत बँकेस सुमारें २½ कोटींचीं कर्जें वसूल करण्याविषयीं सूचना केली होती. ती अंमलांत आणणें अशक्य झाल्यामुळें वरील योजना आंखण्यांत आली. तिला रिझर्व्ह बँकेनेंहि आक्षेप घेतला नाहीं. रिझर्व्ह बँकेच्या नेहमीच्या तपासणी-वरून तिनें भारत बँकेच्या देण्याघेण्याविषयीं सल्ला दिला, त्यांतून वरील योजना निघाली. परंतु भारत बँकेच्या एका भागीदारानें दिल्ली येथील एका सबजज्जाच्या कोर्टाकडून इंजंक्शन मिळवून योजना स्थगित करविली. तथापि, पंजाब हायकोर्टानें इंटेरिम इंजंक्शन रद्द केलें. योजना दोन्ही बँकांच्या भागीदारांच्या सभेंत मंजुरीसाठी ठेविली जाईल. कोणत्याही एका बँकेच्या भागीदारांनीं मंजुरी दिली नाहीं तर योजना आपोआप रद्द होऊन मूळ परिस्थिति कायम राहील.

### श्री. मेहेकींची सेवानिवृत्ति

रिझर्व्ह बँकेचे डेप्युटी गव्हर्नर श्री. मेहेकी हे चार महिन्यांच्या रजेवर गेले असून त्यानंतर ते निवृत्त होणार आहेत. त्यांची जागा श्री. रामनाथ हे घेतील. श्री. रामनाथ हे इंडस्ट्रियल फिनॅन्स कॉर्पोरेशन (दिल्ली) चे मॅनेजिंग डायरेक्टर आहेत. श्री. मेहेकी रिझर्व्ह बँकेंत येण्यापूर्वी १९१४ ते १९४४ म्हैसूर सिव्हिल सर्व्हिसमध्यें, नंतर काश्मीर सरकारचे रेव्हेन्यू ॲडव्हायसर आणि काश्मीरचे डेव्हलपमेंट मिनिस्टर होते. बँकेंतील बँकिंग, ॲग्रि. क्रेडिट व सहकारी खातीं त्यांचेकडे होतीं.

### बँकेंत अफरातफर ?

नॅशनल सेव्हिंग बँकेच्या अहमदाबाद शाखेंत १,६८,००० रु. ची अफरातफर झाली असावी म्हणून अधिकाऱ्यांनीं पोलिसांकडे इं. पि. कोडाच्या ४०९ व ४३४ कलमांखाली तक्रार नोंदविली आहे. पोलिसांनीं बँकेचे कागदपत्र चौकशीसाठी नेले असून कॅशिअरच्या घराची झडती घेऊन त्यास अटक केली आहे.

### शेड्यूल्ड बँका

शेड्यूल्ड बँकांच्या २ मार्च अखेरच्या ताज्या आंकड्यांप्रमाणें त्यांच्या रिझर्व्ह बँकेजवळील शिलका ८१ लाखांनीं कमी होऊन त्या ५५ कोटी, १९ लक्ष रु. झाल्या आहेत. कर्जें २ कोटी ४३ लक्षांनीं कमी होऊन तीं ५०९½ कोटींवर आली आहेत.


**दक्षिण सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि, सांगली**

बँकेची तासगांव शाखा या महिन्यापासून तासगांव येथें गुरुवार पेठेंतील श्री. हिंगमिरे यांचे इमारतींत सुरू झाली आहे. या शाखेच्या पानसुपारी समारंभ बुधवार ता. १४ मार्च १९५१ रोजीं सकाळीं १० वा. बँकेच्या ऑफिसांत होणार आहे. तरी सदर समारंभास आपण अगत्य यावें अशी विनंति आहे.

आपले

ना. पां. ठाणेदार, मॅनेजर — म. अं. वसरदार, चेअरमन.

समारंभस्थळ:— तासगांव शाखेचें ऑफिस — पं. मा. टाकवेकर, एजंट तासगांव.


## अखिल भारतीय पशुप्रदर्शनांत पिंपळे गिलीगन कॅटल ब्रीडिंग फार्मचें अपूर्व यश

हिसार (पंजाब) येथें ता. २६-२-५१ ते ३-३-५१ अखेर नुकत्याच भरलेल्या अखिल भारतीय पशुप्रदर्शनास पूर्व खानदेश जिल्ह्यांतील जळगांव तालुका डेव्हलपमेंट ॲग्रि. को. असोसिएशननें त्यांच्या पिंपळे गिलीगन कॅटल ब्रीडिंग फार्मावरील गाई, कालवडी व वळू मिळून आठ नेमाडी जातीचीं जनावरें पाठविलीं होतीं. प्रदर्शन कमिटीनें ठेवलेल्या एकूण चार पहिल्या प्रतीच्या बक्षिसांपैकी तीन बक्षिसें व दुसऱ्या नंबरचें एक एकूण रुपये ४९० रोख बक्षिसें या जनावरांना मिळालीं. विशेष आनंदाची व भूषणावह गोष्ट ही कीं, प्रदर्शनांत सर्वांत उत्तम जनावर ठरून संस्थेच्या "सम्राट्" नांवाच्या वळूनें ५०० रुपये किंमतीचा होळकर चॅलेंज कप पटकाविला. एकूण नऊ वर्षांपैकीं सतत आठ वर्षे याच संस्थेचीं जनावरें सदर चॅलेंज कप जिंकीत आहेत. जनावरांच्या पैदाशीचें व सुधारणेचें कार्य असोसिएशन किती उत्कृष्ट रीतीनें करीत आहे याची जाणीव वर्षानुवर्षे मिळत असलेल्या यशावरून होईल. फार्म चालविण्याचे कामीं संस्थेस फारच आर्थिक झळ सोसावी लागते. या राष्ट्रीय कार्यास सरकारनें सढळ हातानें आर्थिक मदत केल्यास फार्माची यापेक्षाहि प्रगति होईल यांत शंका नाहीं.

### रिझर्व्ह बँक कायद्यांत दुरुस्ती

रिझर्व्ह बँक कायदा दुरुस्तीच्या बिलांत सिलेक्ट कमिटीनें कांहीं सुधारणा सुचविल्या आहेत. त्या पार्लमेंटास सादर करण्यांत आल्या आहेत. ब वर्गांतील राज्यें भारतांत समाविष्ट झाल्यामुळें जो बदल झाला त्यास अनुसरून कायद्यांत दुरुस्ती करण्याचा मूळ बिलाचा उद्देश होता, परंतु सिलेक्ट कमिटीनें पुष्कळच चर्चा करून कित्येक सुधारणा सुचविल्या. ब वर्गांतील राज्यांमधील ट्रेझरींची व्यवस्था पुढें कशी चालू राहावी ह्याविषयीं ठाकुरदास कमिटीनें सूचना केलेल्या आहेत. त्यांचा भारत सरकार रिझर्व्ह बँकेच्या सल्ल्यानें विचार करीत आहे. ब वर्गांतील राज्यांनीं त्यांतील बँकिंग व ट्रेझरी कामाबद्दलच्या व्यवहारांचा तपशील रिझर्व्ह बँकेबरोबर विचारविनिमय करून ठरवावा आणि तोंपर्यंत सध्याची पद्धत चालू राहावी, असें सिलेक्ट कमिटीचें मत पडलें. हंगामी शेतीच्या व्यवहारासाठीं सहकारी संस्थांना रिझर्व्ह बँकेनें द्यावयाच्या कर्जांची मुदत १२ पासून १८ महिन्यांपर्यंत वाढविण्याबाबत सूचना सिलेक्ट कमिटीनें केली आहे. बँकेच्या गव्हर्नरानें डेप्युटी गव्हर्नराकडे आपला अधिकार सोपविण्याबाबतच्या तरतुदींतहि सुधारणा करण्यांत येणार आहे.

### इनकमटॅक्सचे जुने व नवे दर

| | १९५०–५१ चे दर | | १९५१–५२ चे दर | |
|---|---|---|---|---|
| प्राप्ती | आर्जित | अनर्जित | आर्जित | अनार्जित |
| ३,६०० | नाहीं | नाहीं | नाहीं | नाहीं |
| ५,००० | ११७ | १६४ | १२३ | १७२ |
| ७,२०० | २४७ | ४०५ | २६० | ४२५ |
| ९,६०० | ४५७ | ६६७ | ४८० | ७०० |
| १०,००० | ४९२ | ७११ | ५१७ | ७४६ |
| ३०,००० | ५,३३६ | ६,३३६ | ५,६०३ | ६,६५३ |
| १,००,००० | ४७,६८० | ४८,६८० | ५०,०६४ | ५१,११४ |
| २,००,००० | १,२४,२४२ | १,२५,२४२ | १,३०,४५४ | १,३१,५०४ |
| ३,००,००० | २,०२,३६७ | २,०३,३६७ | २,१२,४८५ | २,१३,५३५ |
| ४,००,००० | २,८०,४९२ | २,८१,४९२ | २,९४,५१७ | २,९५,५६७ |

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा प. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गानिवास', ८२१ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.